# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ०८.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०७/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ७०,७५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०७/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ४६.०७ लिटर दारू व एक मोसा असा एकुण २३,९९०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.०७/०९/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली ग्रा. व वसमत ग्रा. येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०५ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व एक मोबाईल व नगदी असा एकुण २०,६५,५७०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात** :—दिनांक ०७/०९/२०२२ रोजी फिर्यादी अविनाश शिवाजीराव मस्के वर्ष व्य.नौकरी जात हटकर रा भटसावंगी यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा.येथे कलम २७९,३३ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०२.०९.२२ रोजी चे १८:३० वा चे सु बळसोंड शिवारातील नवीन किसान नरसरी समोर रोडवर फिर्यादीची मोसा एमएच ३८ झेड ०६०४ हिस कार क्र एमएच ४४ एस ६७६७ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील नमुद कार भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोसा ला समोरून धडक देवुन यातील फिर्यादीस जखमी करणेस कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—** दिनांक ०७/०९/२०२२ रोजी फिर्यादी गजानन लिंबाजी थोरात रा तोंडापुर ता कळमनुरी यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३०४अ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१७.०७.२२ रोजी चे १२:५० वा चे सु मौ डोंगरकडा येथील पुलाजवळ हिंगोली ते नांदेड रोडवर फिर्यादीचे वडील हे पिक विमा भरण्यासाठी पाई जात असतांना त्यांना डगरकडा फाटा हिंगोली ते नांदेड रोडवर कोणत्या तरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन जोराची धडक देवुन गंभीर मार लागुन त्याचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.

चोरी :—दिनांक ०७/०९/२०२२ रोजी फिर्यादी नामदेव चंद्रभान बेंगाळ वय ३४ वर्ष व्य नौकरी पोशि/३३२ ने पोस्टे वसमत ग्रा यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत ग्रा.येथे कलम ३७९,३४ भादवी सहकलम ४८(७)(८) गौ ख म अधि अन्वये अपराध दाखल असनु दि.०७.०९.२२ रोजी चे ०९:०० वा चे सुमारास मौ किन्होळा पाटी ता वसमत येथे आरोपीतांनी संगणमत करून त्यांचे ताब्यातील ॲपे ॲटो एमएच ०२ वाय ऐ ७९४६ मध्ये विनापरवाना बेकायदेशीर रित्या रॉयल्टी विना पाव ब्रास रेती किअ २,५००रू. चोरून ॲटो मध्ये चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत ग्रा.पोलीस तपास करित आहेत.